# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/पापु व मलनि:/२६१४/२०२४-२५ दि.३०/०९ /२०२४

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** प्रेसनोट महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेबाबत.

सोबत जोडलेली प्रेसनोट महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच सदर प्रेस नोट प्रसिद्ध केल्यानंतर या विभागास वृत्तपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

(दिपक खांबित)
शहरअभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- सिस्टम मॅनेजर
(वेबसाइट प्रसिद्धिकरीता)

# मिरा भाईदर महानगरपालिका
# पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
## // प्रेसनोट //

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ९९ किमी लांबीच्या मलवाहिनी अंथरण्यात आलेल्या असुन प्रचलित पध्दतीनुसार मुख्य मलवाहिनी ते सोसायटीने प्रवेश व्दारापर्यंत महानगरपालिका मार्फत मलवाहिनी अंथरण्यात येत होती. तर प्रवेशव्दार ते सेप्टीक टॅक पर्यत सोसायटीच्या स्वखर्चाने मलवाहिनी टाकण्यात येते. महानगरपालिकेमार्फत मोठया स्वरुपात आर्थिक भार सहन करावा लागत होता. सदर खर्चात बचत होऊन सदर मलवाहिनी जोडण्याच्या कामात गती येणेसाठी महानगरपालिकेने खालील धोरण निश्चित केले आहे.

१. गृहसंकुल/इमारतीच्या सेप्टीक टॅकपासुन मुख्य प्रवेशव्दारापर्यंत संबंधितांनी स्वखर्चाने योगय व्यासाचा एन.पी.४ ग्रेड आर.सी.सी. पाईप वापरुन सदर मलवाहिनी अंथरण्यात यावी.

२. गृहसंकुल/इमारतीचे प्रवेशव्दार ते महानगरपालिकेची मुख्य रस्त्यावर रस्त्याच्या मधोमध मलवाहीनी व त्यावर चेंबर असल्याने सदर मलवाहीनी टाकताना विविध सेवा संस्था वाहिन्या, पुरवठादार यांच्या वाहीन्या, मनपाची जलवाहीनी , गॅसवाहिनी इत्यादी जात असल्याने सदर भागात काळजी पुर्वक रस्ता खोदुन मलवाहीनी अंथरणे आवश्यक असल्याने सदर कामे करण्यासाठी तसेच रस्ता दुरुस्ती करण्यासाठी दर मंजुर करुन कंत्राटदाराचे पॅनेल तयार करण्यात आले असून आवश्यकतेनुसार संबंधित गृहसंकुल/इमारत धारकांनी मंजुर दराने होणारा खर्च संबंधित कंत्राटदाराकडे भरुन मलवाहिनीचे काम करुन घेण्यात यावे.

३. नविन बांधण्यात आलेल्या तसेच बांधकात परवानगी देण्यात आलेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी सदर इमारतीचे प्रवेशव्दार ते महानगरपालिकेच्या मुख्यमलवाहिनीवरील चेंबर पर्यत मलवाहिनी जोडली आहे याबाबत महानगरपालिकेच्या मलनि:सारण विभागाकडुन नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

४. ज्या इमारतीने जुन्या धोरणानुसार त्यांचे प्रवेशव्दारापर्यंत मलवाहिनी टाकुन ठेवली आहे. व महानगरपालिकेकडे जोडणी फी जमा केली आहे. त्या ठिकाणी प्रवेशव्दार ते चेंबर पर्यतची जोडणी काम गृहसंकुलनाच्या खर्चाने वरील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

५. सदर जोडणी देण्यासाठी महानगरपलिकेमार्फत रु.२५०००/- मलजोडणी शुल्क जमा करुन घेण्यात येईल. तसेच जलजोडणी, मलजोडणी व इतर सेवासंस्था वाहिन्या तुटल्यास त्याचा खर्च गृहसंकुल/इमारती धारकाकडुन वसुल करण्यात येईल.

सदर कामासाठी महानगरपालिकेने कंत्राटदार यांचे पॅनेल करुन दर निश्चित केले आहेत. तसेच सदर प्रक्रिया राबविण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात येणार असून सर्व परवानग्या व रकमा जमा करणे हे ऑनलाईन होणार असुन त्यासाठी महानगरपालिकेत येण्याची गरज नाही.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका